कर्नाटक सरकार

सार्वजनिक शिक्षण इलाखा

# अध्ययन पुनर्प्राप्ती
# विद्यार्थी कृतीपुस्तक

## 2022 – 2023

# 7

## विषय समाज विज्ञान – इयत्ता सातवी

समग्र शिक्षण कर्नाटक बेंगळूरू

आणि

राज्य शिक्षण संशोधन प्रशिक्षण संस्था, बेंगळूरू

# ಸಂದೇಶ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಮಕ್ಕಳ ಶಿಕ್ಷಣವೇ ಭಾರತದ ಭವಿಷ್ಯ. ಇದಕ್ಕಾಗಿ ಕೇಂದ್ರ ಸರ್ಕಾರವು ಹೊಸ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ 2020ನ್ನು ಜಾರಿಗೊಳಿಸಿದೆ. ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ 2020 ರ ಶಿಫಾರಸ್ಸುಗಳನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಮುಂಚೂಣಿಯಲ್ಲಿದ್ದು, ವ್ಯವಸ್ಥೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಸುಧಾರಣೆಗಳನ್ನು ತರಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪಠ್ಯಕ್ರಮ ವಿನ್ಯಾಸ, ಕಲಿಸುವಿಕೆಯಲ್ಲಿ ನಾವೀನ್ಯತೆ, ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಮರುವಿನ್ಯಾಸ ಹಾಗೂ ಶಾಲೆಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಸಮೃದ್ಧ ವಾತಾವರಣ ನಿರ್ಮಾಣ ಮಾಡಲು ಹಲವು ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಈಗಾಗಲೇ ನಿಪುಣ್ ಭಾರತ್ ಮಿಷನ್ ಅಡಿಯಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನ ಕೌಶಲಗಳನ್ನು ಖಾತ್ರಿಪಡಿಸುವಲ್ಲಿ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತಗೊಂಡಿದೆ.

ಪ್ರಸ್ತುತ ಕೋವಿಡ್-19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ರೋಗದಿಂದಾಗಿ ಮಕ್ಕಳು ಔಪಚಾರಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಪಡೆಯುವಲ್ಲಿ ಅಡೆತಡೆಗಳಾಗಿ, ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾನಷ್ಟವಾಗಿರುತ್ತದೆ. ಔಪಚಾರಿಕ ಹಾಗೂ ಅನೌಪಚಾರಿಕ ಕಾರ್ಯತಂತ್ರಗಳ ಮೂಲಕ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯ ನಿರಂತರತೆಗೆ ಪ್ರಯತ್ನಿಸಿದ್ದಾಗ್ಯೂ ಸಹ ನಿರೀಕ್ಷಿತ ಮಟ್ಟದ ಕಲಿಕೆ ಆಗದಿರುವುದನ್ನು ಹಲವು ಅಧ್ಯಯನಗಳು ತಿಳಿಸಿವೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ನಾವೆಲ್ಲರೂ ಕಾರ್ಯಪ್ರವೃತ್ತರಾಗಬೇಕಿದೆ. ಸದರಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ 'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ' ಎಂಬ ವಿನೂತನ ಉಪಕ್ರಮವನ್ನು 2022-23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸುತ್ತಿದೆ.

ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಿಂದಿನ ಎರಡು ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾಗಿದ್ದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿದೆ. ಇದಕ್ಕೆ ಸಂವಾದಿಯಾಗಿ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಪ್ರಮುಖ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳನ್ನು ಜೋಡಿಸಿ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ಸಿದ್ಧಪಡಿಸಲಾಗಿದೆ. ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳು ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಂದ ಕೂಡಿದ್ದು, ಮಗುವಿನ ಮುಗ್ಧ ಮನಸ್ಸಿಗೆ ಸಂತೋಷವನ್ನುಂಟು ಮಾಡುವಂತೆ ರೂಪಿಸಲಾಗಿರುತ್ತದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಪೂರ್ಣಗೊಳಿಸುವುದರಿಂದ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಬಹುದು ಎಂಬ ಆಶಯ ನನ್ನದಾಗಿರುತ್ತದೆ. ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ, ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಗಳು ಮತ್ತು ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳು ಪರಸ್ಪರ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ಶಿಕ್ಷಕರು, ಕೈಪಿಡಿಯಲ್ಲಿ ನೀಡಿದ ಮಾರ್ಗಸೂಚಿಯನ್ವಯ ಈ ವಿನೂತನ ಕಾರ್ಯವನ್ನು ಅದರ ಅಂತಸ್ಸತ್ವದಿಂದ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ, ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯ ಸುಧಾರಣೆಗೆ ಕಾರಣವಾಗುತ್ತೀರಿ ಎಂದು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ. ಆದ್ದರಿಂದ ಇಲಾಖೆಯ ಸರ್ವರೂ, ಪೋಷಕವರ್ಗ ಮತ್ತು ಭಾಗೀದಾರರೆಲ್ಲರೂ ಇದರಲ್ಲಿ ಪರಿಣಾಮಕಾರಿಯಾಗಿ ಕೈ ಜೋಡಿಸಿ ಈ ಕಾರ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಯಶಸ್ವಿಗೊಳಿಸುತ್ತೀರೆಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ.

ಎಲ್ಲರಿಗೂ ಶುಭವಾಗಲಿ............

**ಶ್ರೀ ಬಿ.ಸಿ.ನಾಗೇಶ**
ಪ್ರಾಥಮಿಕ ಹಾಗೂ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ
ಹಾಗೂ ಸಕಾಲ ಸಚಿವರು.

# ಮುನ್ನುಡಿ



ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ–2020ರ ಆಶಯದಂತೆ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆ ಮತ್ತು ಅಭಿವೃದ್ಧಿ ನಮ್ಮೆಲ್ಲರ ಜವಾಬ್ದಾರಿ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕ ವಿಪತ್ತಿನಿಂದ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ವ್ಯತ್ಯಯವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಪಾಡಿಕೊಳ್ಳಲು ಕಳೆದೆರಡು ವರ್ಷಗಳಿಂದ ಸಾಧ್ಯವಾಗಿರುವುದಿಲ್ಲ. ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರವಾಗಿರುತ್ತದೆ. ಈ ಅಂತರವನ್ನು ನೀಗಿಸಲು 2022–23ನೇ ಸಾಲಿನಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಎಂಬ ವಿನೂತನ ಉಪಕ್ರಮವನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ.

ಈ ಉಪಕ್ರಮದ ಮೂಲಕ ಎಲ್ಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ, ಸಂಖ್ಯಾ ಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗುವುದು ಹಾಗೂ ಮಗು ತನ್ನ ಹಿಂದಿನ ತರಗತಿಗಳಲ್ಲಿ ಅತ್ಯಗತ್ಯವಾಗಿ ಗಳಿಸಲೇಬೇಕಿದ್ದ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ 'ಅತಿ ಮುಖ್ಯ ಕಲಿಕಾ ಫಲ' ಗಳನ್ನು ಗುರುತಿಸಿ, ಚಟುವಟಿಕೆ ರೂಪಿಸಿ, ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ಮತ್ತು ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿಯನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ಇವುಗಳಲ್ಲಿ 'ನಿಪುಣ್ ಭಾರತ್', 'ವಿದ್ಯಾಪ್ರವೇಶ್'ನಂತಹ ಉಪಕ್ರಮಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಲಾಗಿದೆ. ಈ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ, ಕಲಿಕಾ ಹಾಗೂ ಶಿಕ್ಷಕ ಸ್ನೇಹಿಯಾಗಿವೆ. ಚಟುವಟಿಕಾ ಹಾಳೆಗಳ ಜೊತೆಗೆ, ಶಿಕ್ಷಕರಿಗೆ ಅಗತ್ಯ ಮಾರ್ಗದರ್ಶನ ನೀಡುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ'ಯನ್ನೂ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ನೀಡಲಾಗುತ್ತಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಸರಿದೂಗಿಸುವ ಕಾರ್ಯವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ಜವಾಬ್ದಾರಿಯಿಂದ ನಿರ್ವಹಿಸುತ್ತೀರೆಂಬ ಆಶಯವನ್ನು ಹೊಂದಿರುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ DSERT ಹಾಗೂ SSK ಯ ಅಧಿಕಾರಿಗಳಿಗೆ ಅಭಿನಂದನೆಗಳು. ಈ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ಸಹಕರಿಸಿದ ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್ ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಸಂಸ್ಥೆಗೂ ಇಲಾಖೆಯ ಪರವಾಗಿ ಅಭಿನಂದನೆಗಳು.

**ಡಾ. ಸೆಲ್ವಕುಮಾರ್ ಎಸ್.** ಭಾ.ಆ.ಸೇ.
ಸರ್ಕಾರದ ಪ್ರಧಾನ ಕಾರ್ಯದರ್ಶಿ,
ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ

# ಆಶಯ ನುಡಿ



ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಬದುಕಿನಲ್ಲಿ ಪ್ರತೀ ನಿತ್ಯವೂ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದರೆ ಕೋವಿಡ್–19 ಸಾಂಕ್ರಾಮಿಕದಿಂದಾಗಿ ಜಾಗತಿಕವಾಗಿ ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಗೆ ವ್ಯತ್ಯಯ ಉಂಟಾಗಿ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವಾಗಿರುವುದು ವೇದ್ಯ. ಇದನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವುದು ನಮ್ಮ ಆದ್ಯ ಕರ್ತವ್ಯವಾಗಿದೆ. ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದಲ್ಲಿ ಕೋವಿಡ್–19 ನಿಂದಾಗಿ ಶಾಲೆಗಳು ಮುಚ್ಚಲ್ಪಟ್ಟಾಗ ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದ, ವಿಶೇಷ ಸೇತುಬಂಧ ಮುಂತಾದ ಪರ್ಯಾಯ ಕಾರ್ಯಕ್ರಮಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿದರೂ ಮುಖಾಮುಖಿ ತರಗತಿ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗೆ ಇವೆಲ್ಲಾ ಸಮಾಂತರವಾಗುವುದಿಲ್ಲ. ಪ್ರಸ್ತುತ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಉಪಕ್ರಮವು ವೈಜ್ಞಾನಿಕ ತಳಹದಿಯ ಮೇಲೆ ಶಿಶು ಕೇಂದ್ರಿತ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ರೂಪಿಸಿ ನೀಡುತ್ತಿರುವ ವಿನೂತನ ಪ್ರಯತ್ನ. ಸರಿಸುಮಾರು ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಪ್ರಕ್ರಿಯೆಗಳು ಪೂರ್ಣವಾಗಿ ನಡೆಯದೇ, ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಉಂಟಾಗಿರುವ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸುವ ಸಲುವಾಗಿಯೇ ರೂಪಿಸಿದ ಉಪಕ್ರಮ. ಈ ಕಾರ್ಯವನ್ನು ಒಂದು ವರ್ಷದವರೆಗೆ ರಾಜ್ಯದಾದ್ಯಂತ ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ತಾವೆಲ್ಲರೂ ತುಂಬಿಕೊಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಉಪಕ್ರಮದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಠಾನಕ್ಕಾಗಿ ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳುವಿರೆಂದು ನಂಬಿದ್ದೇನೆ.

**ಡಾ. ವಿಶಾಲ್ ಆರ್.** ಭಾ.ಆ.ಸೇ.
ಆಯುಕ್ತರು,
ಸಾರ್ವಜನಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ

# ಆರಂಭಿಕ ನುಡಿ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಎರಡು ವರ್ಷಗಳ ಕಾಲ ಕೋವಿಡ್–19ರ ಕಾರಣದಿಂದ ಔಪಚಾರಿಕ ತರಗತಿಗಳು ನಿರೀಕ್ಷೆಯಂತೆ ನಡೆಯದೇ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟ ಉಂಟಾಗಿರುವುದು ಶೋಚನೀಯ. ಇದರಿಂದಾಗಿ ಕಲಿಕಾ ಅಂತರ, ಸಾಮಾಜಿಕ ಹಾಗೂ ಭಾವನಾತ್ಮಕ ಏರುಪೇರುಗಳೂ ಉಂಟಾಗಿವೆ. ಈ ಎಲ್ಲ ಅಡೆತಡೆಗಳನ್ನು ನಿವಾರಿಸಿ, ಕಲಿಕಾ ನಿರಂತರತೆಯನ್ನು ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲು 2022–23ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಉಪಕ್ರಮವನ್ನು ಅನುಷ್ಠಾನಗೊಳಿಸಲಾಗುತ್ತಿದೆ. ಪ್ರತಿಯೊಬ್ಬ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಯು ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದು ಪ್ರಥಮ ಆದ್ಯತೆಯಾಗಿರುತ್ತದೆ. ಎಲ್ಲಾ ಕಲಿಕೆಗೆ ಮೂಲಭೂತವಾಗಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಅತ್ಯಗತ್ಯ. ಆದ್ದರಿಂದ ಆಯಾ ತರಗತಿಯ ನಿರ್ದಿಷ್ಟ ಕಲಿಕಾ ಫಲಗಳೊಂದಿಗೆ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನದ ಕಲಿಕಾ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತಗೊಳಿಸಿ ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ ಉಪಕ್ರಮವನ್ನು ರೂಪಿಸಲಾಗಿದೆ. ಇಲ್ಲಿ ನೀಡಿರುವ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳನ್ನು ತಾವು ಬಳಸಿಕೊಂಡು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಕಲಿಕಾ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವಿರಿ ಹಾಗೂ ಕಲಿಕಾ ಅಂತರವನ್ನು ಪೂರೈಸುವಿರಿ ಎಂದು ಆಶಿಸುತ್ತೇನೆ. ಇದನ್ನು ಶಾಲಾಧಾರಿತವಾಗಿ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಮಾಡುತ್ತಾ ನಿಗದಿತ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮತ್ತು ಪರಿಕಲ್ಪನೆ ಗಳಿಕೆಗೆ ಪ್ರಾಮಾಣಿಕ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡುತ್ತೀರಿ ಎಂದು ನಂಬಿರುತ್ತೇನೆ. ತಮ್ಮೆಲ್ಲರ ಬೆಂಬಲದಿಂದ ಪರಿಣಾಮಕಾರಿ ಅನುಷ್ಠಾನ ಸಾಧ್ಯ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಎಲ್ಲರಿಗೂ ಯಶಸ್ಸನ್ನು ಹಾರೈಸುತ್ತೇನೆ.

**ಶ್ರೀಮತಿ ಪಲ್ಲವಿ ಆಕುರಾತಿ** ಭಾ.ಆ.ಸೇ

ರಾಜ್ಯ ಯೋಜನಾ ನಿರ್ದೇಶಕರು, ಸಮಗ್ರ ಶಿಕ್ಷಣ ಕರ್ನಾಟಕ

# ಪ್ರಾಸ್ತಾವಿಕ ನುಡಿ



ಆತ್ಮೀಯರೇ,

ಹೊಸ ಶತಮಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಶಿಕ್ಷಣ ನೀತಿ–2020ರ ಅನುಷ್ಠಾನ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಕ್ಷೇತ್ರದಲ್ಲಿನ ಬದಲಾವಣೆಗೆ ನಾವೆಲ್ಲರೂ ತೆರೆದುಕೊಳ್ಳಬೇಕಿದೆ. ಅದರ ಜೊತೆಗೆ ಕೋವಿಡ್ ಸಂದರ್ಭದಲ್ಲಿ ಉಂಟಾದ ವ್ಯತಿರಿಕ್ತ ಪರಿಣಾಮವನ್ನು ಸರಿಪಡಿಸುವ ಹೊಣೆಗಾರಿಕೆ ಮಹತ್ತ್ವದ್ದಾಗಿದೆ. ಕಳೆದ ಎರಡು ವರ್ಷಗಳಲ್ಲಿ ಬಹು ಮಾಧ್ಯಮಗಳನ್ನು ಬಳಸಿಕೊಂಡು ವಿದ್ಯಾಗಮ, ಸಂವೇದದಂತಹ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಉಪಕ್ರಮಗಳ ಮೂಲಕ ಮಾಡಿದ ಪ್ರಯತ್ನಗಳ ನಡುವೆಯೂ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಸಾಕಷ್ಟು ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಉಂಟಾಗಿರುವುದು ವಾಸ್ತವದ ಸಂಗತಿ. ಕಲಿಕಾ ನಷ್ಟ, ಕಲಿಕಾ ಅಂತರ ಪೂರೈಸುವ ಯೋಜನೆಯೇ 'ಕಲಿಕಾ ಚೇತರಿಕೆ' ಉಪಕ್ರಮ. ಈ ಸಂದರ್ಭೋಚಿತ ಉಪಕ್ರಮದಲ್ಲಿ ಈ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಬುನಾದಿ ಸಾಕ್ಷರತೆ ಮತ್ತು ಸಂಖ್ಯಾಜ್ಞಾನ ಸಾಮರ್ಥ್ಯವನ್ನು ಸಾಧಿಸುವುದರೊಂದಿಗೆ, ಹಿಂದಿನ ಎರಡು ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷಗಳ ಆಯ್ದ ಕಲಿಕಾಫಲಗಳು ಹಾಗೂ ಪ್ರಸಕ್ತ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಅತ್ಯಗತ್ಯ ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಎಲ್ಲಾ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಸಾಧಿಸುವ ಗುರಿಯನ್ನು ಇಟ್ಟುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಈ ಸಾಧನೆಗಾಗಿ ಕಲಿಕಾ ಪ್ರಕ್ರಿಯೆಯ ಸಾಧ್ಯತೆಗಳನ್ನು ಸೂಚಿಸುವ 'ಶಿಕ್ಷಕರ ಕೈಪಿಡಿ' ಮತ್ತು ಶಿಶುಕೇಂದ್ರಿತ ಕಲಿಕಾ ಪೂರಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನೊಳಗೊಂಡ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ 'ಕಲಿಕಾ ಹಾಳೆ'ಗಳ ಪುಸ್ತಕ ಎಂಬ ಎರಡು ಸಾಹಿತ್ಯಗಳನ್ನು ಸೃಜಿಸಲಾಗಿದೆ. ಈ ಕಲಿಕಾ ಹಾಳೆಗಳಲ್ಲಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಕಲಿಯಲೇಬೇಕಾದ ಸಾಮರ್ಥ್ಯ, ಪರಿಕಲ್ಪನೆ ಮತ್ತು ಕಲಿಕಾಫಲಗಳನ್ನು ಕೇಂದ್ರೀಕರಿಸಿದೆ. ಇವುಗಳನ್ನು ಬಳಸಿ ಮಕ್ಕಳ ಕಲಿಕಾ ನಷ್ಟವನ್ನು ಸರಿದೂಗಿಸಲು ಎಲ್ಲಾ ಭಾಗೀದಾರರು ಸಕ್ರಿಯವಾಗಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕಾಗಿ ಈ ಮೂಲಕ ವಿನಂತಿಸುತ್ತೇನೆ. ಈ ಕಾರ್ಯಾಭಿವೃದ್ಧಿಯಲ್ಲಿ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ ಇಲಾಖಾ ಮಿತ್ರರು ಮತ್ತು ಅಜೀಂ ಪ್ರೇಮ್‌ಜೀ ಫೌಂಡೇಶನ್ ಇವರಿಗೆ ಅಭಿನಂದನೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತೇನೆ.

ಶುಭವಾಗಲಿ.

**ಶ್ರೀಮತಿ ಸುಮಂಗಲ ವಿ.**

ನಿರ್ದೇಶಕರು, ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು

| ಪರಿಕಲ್ಪನೆ & ಮಾರ್ಗದರ್ಶನ | |
|---|---|
| **ಡಾ॥ ಎಸ್ ಸೆಲ್ವಕುಮಾರ್** ಭಾ.ಆ.ಸೇ<br>ಪ್ರಧಾನ ಕಾರ್ಯದರ್ಶಿಗಳು<br>ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು | **ಡಾ. ವಿಶಾಲ್ ಆರ್.** ಭಾ.ಆ.ಸೇ<br>ಆಯುಕ್ತರು<br>ಸಾರ್ವಜನಿಕ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು |
| **ಶ್ರೀಮತಿ ಪಲ್ಲವಿ ಆಕುರಾತಿ.** ಭಾ.ಆ.ಸೇ<br>ರಾಜ್ಯ ಯೋಜನಾ ನಿರ್ದೇಶಕರು<br>ಸಮಗ್ರ ಶಿಕ್ಷಣ ಕರ್ನಾಟಕ, ಬೆಂಗಳೂರು | **ಶ್ರೀಮತಿ ಸುಮಂಗಲ ವಿ.**<br>ನಿರ್ದೇಶಕರು, ಡಿ.ಎಸ್.ಇ.ಆರ್.ಟಿ<br>ಬೆಂಗಳೂರು |

| जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, चिक्कोडी<br>साहित्य रचना समिती | |
|---|---|
| **सतीश के. आर.**<br>सह. शिक्षक, स.उ.प्रा. शाळा. मलवगोप्प<br>शिमोगा | **मंजुनाथ बी. एन.**<br>सह. शिक्षक, स.उ.प्रा. शाळा. करेमट्टी<br>होसनगर |
| **रघू जी.**<br>सह. शिक्षक, स.उ.प्रा. शाळा. अलवळ्ळी<br>होसनगर | **दादावल्ली एम.**<br>सह. शिक्षक, स.प्रौढ शाळा,<br>तेवर |

| परिशिलक |
|---|
| डॉ. हरिप्रसाद जी. व्ही.<br>वरिष्ठ प्राध्यापक, डायट-शिवमोग्गा |

| भाषांतर समिती सदस्य | |
|---|---|
| **श्री एस.आर.मरटी (स.शि.)**<br>स.मराठी उ.प्राथ शाळा, इंगळी. जि: चिक्कोडी | **श्री एम. एस. कोळी (स.शि.)**<br>स.मराठी उ.प्राथ शाळा, मानेवाडी. जि: चिक्कोडी |
| **श्री. एम. ए. पाटील (स.शि.)**<br>स.मराठी उ.प्राथ शाळा, संभाजी नगर, निपाणी | |

**भागीदार**

**अजीम प्रेमजी फौंडेशन**

**आणि**

**इ.वि.जी. विभाग डी.एस.ई.आर.टी**

**बेंगळूरू**

# अनुक्रमणिका

**इयत्ता : 7 वी** **विषय : समाज विज्ञान**


| अ.न. | घटकाचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| 1 | इतिहासाचे स्तोत्र | 1 |
| 2 | इतिहासाची कालगणना | 6 |
| 3 | मध्ययुगीय भारताचा पाया | 9 |
| 4 | मध्ययुगीय भारत ऐतिहासिक कालगणना | 14 |
| 5 | उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटनांमधील आंतरसंबंध | 17 |
| 6 | मध्यकालीन राजवटीची पद्धती | 19 |
| 7 | सामाजिक धार्मिक परिस्थिती | 30 |
| 8 | युद्धाची कारणे व परिणाम | 33 |
| 9 | जलमार्गाचा शोध | 38 |
| 10 | ईस्ट इंडिया कंपनीचा विस्तार | 44 |
| 11 | ब्रिटिश राजवटीत शेतीवरील परिणाम | 46 |
| 12 | भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध आणि ब्रिटिश सुधारणा | 51 |
| 13 | सामाजिक आणि धार्मिक सुधारणा | 54 |
| 14 | गांधीयुग | 56 |
| 15 | कर्नाटक एकीकरण आणि सीमावाद | 59 |
| 16 | दिशा | 63 |
| 17 | नकाशे | 68 |
| 18 | खंड | 72 |
| 19 | हवामान आणि वातावरण | 76 |
| 20 | आशिया खंड | 80 |
| 21 | संविधानाची गरज | 81 |
| 22 | मूलभूत हक्क आणि कर्तव्य | 87 |
| 23 | राज्याची मार्गदर्शक तत्वे | 89 |
| 24 | आमचे संरक्षण दल | 91 |

प्रिय विद्यार्थी मित्रहो,

Covid-19 एका संसर्गजन्य रोगाला तोंड देत इयत्ता 7 वी च्या वर्गात येईपर्यंत तुम्ही मौजमजा, अभ्यास हे सर्व सोडून देऊन आलेल्या प्रसंगाला समर्थपणे तोंड दिला, खरंच तुम्ही हुशार मुले आहात.

सातवी वर्गामध्ये समाज विज्ञान शिकण्यासाठी वर्गामध्ये अवगत करावयाचे अध्ययन अंश यांची माहिती दिली आहे. पुढच्या वर्षी आठवीच्या वर्गात गेल्यावर समजणार नाही म्हणून काही कृती या अध्ययन पुस्तकात दिली आहेत. तुम्हाला तुम्ही स्वतः अथवा तुमच्या मित्रांबरोबर तसेच गरज असल्यास शिक्षकांच्या मदतीने या पुस्तकात दिलेल्या कृती तुम्ही करा. यामध्ये तुम्ही स्वतः करावयाच्या कृती भरपूर आहेत. त्यांचे अध्ययन चांगले व परिणामकारक होईल.

**या पुस्तकातील कृती खालील प्रमाणे वापरा.**

- स्वत: किंवा तुमच्या मित्रांसोबत दिलेल्या कृतीमध्ये सहभागी व्हा.
- दिलेल्या विषयाचा विचार करा. जास्तीत जास्त तुमचे मित्र, भाऊ, बहीण, शिक्षकांसोबत दिलेल्या विषयी संबंधी बोला.
- तुमच्या पाठ्यपुस्तका सोबत इथे दिलेल्या साहित्याचे वाचन करा.
- अध्ययन अंशामध्ये दिलेल्या कृती करा.
- आणखी काही जास्तीची माहिती हवी असल्यास शिक्षकांबरोबर चर्चा करा. तसेच मुख्य पानावर दिलेल्या संकेतस्थळावर पत्र अथवा इमेल द्वारे संपर्क साधा.
- आनंदाने शिका, उत्साहाने खूप मोठे व्हा.

## अध्ययन अंश 1

# इतिहासाचे स्त्रोत

**अध्ययन निष्पत्ती:** 1) इतिहासाचे स्त्रोत समजून घेणे

मुलांनो,

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची सुसंगतपणे दिलेली माहिती होय. भूतकाळात जे काही घडले ते समजून घेणे, त्या कालखंडातील बदल समजून घेणे, याचा आपल्याला होणारा फायदा, त्यापासून आपण आपले पूर्वज कसे होते ? काय करत होते ? त्याचा मानवी विकासातील योगदान काय ? हे समजून घेऊन त्यांनी केलेल्या चुका टाळून भविष्यकाळातील प्रगती करणे इतिहासाच्या अभ्यासातून शक्य होते. त्याच बरोबर प्रथम आपण आपले कुटुंब, शाळा व आपल्या परिसराचा इतिहास समजून घेतला पाहिजे. तर चला आता आपण आपल्या शाळेच्या इतिहासा पासून सुरुवात करुया.

**अध्ययन पत्रक 1**

**कृती 1:** माझ्या शाळेविषयी मला किती माहिती आहे?

तुमच्या शाळेचे चित्र काढून खालील माहिती भरा.

| सध्याचा तपशील | | मागील तपशील | |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापकांचे नाव | | शाळा स्थापना वर्ष | |
| शिक्षकांची संख्या | | उद्घाटन केलेली व्यक्ती | |
| विद्यार्थ्यांची संख्या | | प्रथम मुख्याध्यापकांचे नाव | |
| वर्गखोली संख्या | | शाळा प्रारंभी शिक्षक संख्या | |
| शाळा असणारा प्रदेश (गाव आणि सर्व्हे नंबर) | | शाळा प्रारंभी असणारी विद्यार्थी संख्या | |
| शाळा सुविधा-ग्रंथालय, संगणक, प्रयोगशाळा. | | शाळा सुरुवातीस असणारी वर्ग खोल्यांची संख्या | |
| खेळाचे मैदान | | शाळा असणारा प्रदेश (गाव आणि सर्व्हे नंबर) | |
| इतर माहिती | | शाळा प्रारंभी असणाऱ्या सुविधा- (ग्रंथालय, संगणक, प्रयोगशाळा) | |

**शाळा प्रारंभापासून आतापर्यंत झालेले मुख्य बदल लिहा.**

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

* **सुचना:** ही माहिती संग्रहीत करण्यासाठी माजीविद्यार्थी, जेष्ठ व्यक्ती,पालक तसेच शिक्षक,शाळा फलक, जुने फोटो यांची मदत घ्या.

**कृती 2:** अशा रितीने आपण शाळेची माहिति मिळविली आहे.त्यावर चर्चा करुया.

मुलांनो!

- शाळा प्रारंभावेळची माहिती तुम्ही कशी मिळविली ?
- कोणी मदत केली ? कोणत्या कागदपत्रांची मदत झाली ?
- शाळेची माहिती संग्रहीत करण्यासाठी अशा अनेक घटकांची मदत झाली आहे. शाळा स्थापनेपासून आतापर्यंत झालेल्या अनेक बदलांबद्दल आपण समजून घेतले आहे.

वरील माहिती सांगितलेल्या व्यक्ती शाळेच्या इतिहासाचा आधार आहेत. मग मानव व पूर्व काळातील लोक कसे बदलले आहेत? कोणी राज्य केले ? कोणत्या घटना घडल्या ? आम्हाला कसे कळले ? आजच्या जगाचा इतिहास पूर्व संस्कृती काळापासून शाळा इतिहास याची माहिती कोणत्या घटकामुळे समजली ? ते पाहू.

## अध्ययन पत्रक 2

**कृती 1:** चित्र पाहून ओळखा, नाव देऊ या.



**वरील चित्रांची नावे लिहा.यातून आपण काय शिकू शकतो यावर तुमचा अभिप्राय लिहा व वर्गात चर्चा करा.**

________________________________________

________________________________________

**कृती 2:** मुलांनो! वरील कृतीतून इतिहासाचे स्त्रोत कोणते हे समजले.आता या चित्रांच्या आधारे खालील कोष्टकात या स्त्रोतांचे वर्गीकरण करा.

| **साहित्यीक स्त्रोत** | **पुरातन स्त्रोत** |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**कृती 3:** इतिहास लेखनासाठी सहाय्यक ठरणाऱ्या तुमच्या परिसरातील स्मारकांची यादी करा.

**कृती 4:** तुमच्या गावचा इतिहास समजण्यासाठी कोणताही एक पुरावा तुमच्या गावातील जेष्ठ व्यक्ती,शिक्षकांच्या मदतीने तुमच्या गावचा इतिहास लिहून वर्गासमोर सादर करा.

आपण इतिहास लेखनासाठी ऐतिहासीक पुरावे किती महत्वाचे आहेत हे समजून घेतले आहे. इतिहासात पुरावे नसतील तर त्या घटना काल्पनीक समजल्या जातात त्यामुळे इतिहास समजावून घेताना ऐतिहासीक पुरावे महत्वाचे असतात.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

## अध्ययन अंश 2

## इतिहासातील कालगणना

**अध्ययन निष्पत्ती 2:** ऐतिहासिक कालगणनेची वैशिष्ट्ये ओळखणे.

मुलांनो .! लक्ष द्या.

एका वर्षातील दिवस किती?

दशक म्हणजे काय ?

तसेच दशक म्हणजे किती?

या प्रश्नांना उत्तरे देऊ शकाल ?

दशक म्हणजे दहा म्हणजे दहा वर्ष

शतक म्हणजे ______________

**माहितीसाठी:** इतिहासामध्ये कालगणनेला अतिशय महत्त्व आहे. आपण 365 दिवसांचे 1 वर्ष मानतो तसेच, 10 वर्षांचे दशक, 100 वर्षाचे शतक, 1,000 वर्षाला सहस्त्र म्हणतो.इ.स. पूर्व म्हणजे इ.स.वी सनापूर्वीचा काळ व इ.स. म्हणजे इ.स.वी सना नंतरचा काळ समजला जातो.



## अध्ययन पत्रक 3

**कृती 1:** चला शतक समजावून घेऊया.

आज आम्ही कोणत्या शतकात आहोत ?

शतक म्हणजे शंभर वर्ष उदा. इ.स. 1 ते 100 वर्षापर्यंत चे शतक पहिले, 1901 ते 2000 या वर्षांना विसावे शतक म्हणतात. 21 वे शतक कोणत्या वर्षापासून सुरू होते ते कोणत्या वर्षी संपेल?




**कृती 2:** खालील तक्त्यामध्ये दिलेले वर्ष ते कोणते शतक आहे ते शोधा.

| वर्ष | शतक |
|---|---|
| इ.स. 1947 | 20 वे शतक |
| इ.स. 2021 | |
| इ.स. 1885 | |
| इ.स. 1600 | |
| इ.स. 1550 | |
| इ.स. 1951 | |

**कृती 3:** कालक्रमानुसार लिहूया.

**1. खालील घटना कालक्रमानुसार लिहा.**

- तुम्ही जन्मलेले वर्ष
- भारत स्वतंत्र झालेले वर्ष
- तुम्ही शाळेत दाखल झालेले वर्ष
- भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध

1. ______________________

2. ______________________

3. ______________________

4. ______________________

**2. खालील घटना कालमापन रेषेवर दाखवा.**

1. तुम्ही जन्मलेले वर्ष
2. भारत स्वतंत्र झालेले वर्ष
3. भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध



इ.स.1500 इ.स.1600 इ.स.1700 इ.स.1800 इ.स.1900 इ.स.2000 इ.स.2100

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

# अध्ययन अंश 3

## मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा पाया

**अध्ययन निष्पत्ती:** मध्ययुगीन भारताचा इतिहास पुन्हा तयार करण्यासाठी एक उपयुक्त स्त्रोत

इतिहास वाचताना पुरावे फार महत्त्वाचे असतात. त्यांच्याशिवाय इतिहास जाणून घेणे कठीण आहे. त्याच्यासाठी काही पुरावे हवे आहेत ते आम्ही एक उदाहरणाद्वारे पाहूया.

तुमचा जन्म ज्या वर्षी झाला. त्याचे जन्म प्रमाणपत्र हा इतिहास नोंदीचा पुरावा मानला जातो.

आपल्याला आपल्या पूर्वजांचा इतिहास जाणून घ्यायचा झाल्यास त्याचे निवासस्थान, इमारती त्यांनी वापरलेल्या वस्तू, त्यांनी लिहिलेल्या नोंदी यांचा उपयोग होतो. आपल्या देशातील राजघराण्यांचा इतिहास जाणण्यासाठी ही अशा नोंदी खूप उपयुक्त ठरतात. त्या काळातील स्मारके, नाणी त्या काळात रचलेले साहित्य, समाधी त्याचबरोबर, शिल्पे यांना आपण विसरता कामा नये. अशा वस्तू आपणास सापडल्यास आपण त्याचे जतन केले पाहिजे.

या अगोदरच्या वर्गात आपण अनेक राजघराण्याबद्दल शिकला आहातच. त्या आधारे आपण मध्ययुगीन भारताचा इतिहास समजून घेण्यास मदत होईल हे समजून घेऊ.

## अध्ययन पत्रक 4

## इतिहास रचनेला सहाय्यक मुद्दे

**कृती 1:** मुलांना खाली तुम्हाला हळेबीड येथील होयसळ मंदिरातील काही शिल्पांची छायाचित्रे दिलेली आहेत तुम्ही त्यांचे निरीक्षण करा तुम्ही निरीक्षण केलेले काही ठळक मुद्दे लिहून काढता का ?






**1. वेशभूषा आणि केशरचना**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**2. नृत्य व संगीत वाद्य**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

3. काम आणि उपकरणे

4. विधी आणि प्रथा.

5. वरील विषयां व्यतिरिक्त जादाची माहिती लिहा.

## अध्ययन पत्रक 5

## ऐतिहासिक दाखले

**कृती 1:** तुमच्या पुस्तकात वास्तुशिल्प कलेचे प्रकार दिले आहेत. तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा. विविध वास्तू शिल्पाची माहिती गोळा करा.

**कृती 2**: मुलांनो खाली विजय नगर, बहामनी आणि आदिलशाही घराण्यातील काही स्मारके दिलेली आहेत. ही स्मारके ओळखून त्याचा इतिहास लेखनास कशी मदत होते याची वर्गात चर्चा करा.



विजय विठ्ठल देवालय हम्पी



कमल महल हम्पी



सोळा खांबी मशीद बिदर



मोहम्मद गवानचा मदरसा बिदर



इब्राहिम रोजा विजयपूर



मेहतर महल विजयपूर

| हिंदुशैली | इस्लामिक शैली | इंडो इस्लामिक शैली |
|---|---|---|
| | | |

**कृती 1:** मुलांनो मध्ययुगीन काळात इमारती निर्माण करताना मुस्लीम राज्यकर्त्यांनी हिंदू शैलीचा व हिंदू राज्यकर्त्यांनी इस्लामीक शैलीचा वापर केला होता. यामधून आपण काय शिकू शकतो. याबद्दल वर्गात चर्चा करा.

**कृती 2**: तुमच्या गावातील अथवा परिसरातील ऐतिहासीक स्मारकाचे चित्र खालील कोष्टकात चिकटवा व त्यासंबंधीत वास्तुशिल्प, काळ, कोणी बांधले इ. माहीती लिहा.

| चित्र | विवरण |
|---|---|
| चित्र येथे चिकटवा | |

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

| |
|---|
| शिक्षक सही |

## अध्ययन अंश 4

## मध्ययुगीन भारताची कालगणना

**अध्ययन निष्पत्ती:** उत्तर व दक्षिण भारताशी संबंधीत ऐतिहासीक घटनांची कालगणना समजून घेणे.

### कालानुक्रमे अर्थ समजावून घेऊया!

आपला इतिहास समजून घेण्यासाठी कालगणना म्हणजे घटना समजून घेणे आवश्यक आहे. हा विषय समजावून घेण्यासाठी आमच्या कुटुंबाच्या कालक्रमणा बद्दल बोलूया.

**शिक्षक:** तुमच्या घरात कोणकोण आहेत ?

**मुले:** सर बाबा, आई, भाऊ, बहीण, काकी हे सर्व जण आहेत.

**शिक्षक:** होय मग सांगा पाहू, त्यांच्यापैकी अगोदर कोण जन्मले आहे ?

**मुले:** सर आमचे काका, नंतर वडील, आत्या, नंतर काकांचा मुलगा आणि शेवटी मी.

**शिक्षक:** होय किती छान सांगितलं. हे तुला कसे माहीत झाले ?

**मुले:** आमच्या घरी सर्वात अगोदर काका जन्मले आणि शेवटी मी म्हणून मला व्यवस्थित समजले.

**शिक्षक:** फार छान, मुलांनो ,यालाच आपण काल रेषा म्हणतो. मी तुम्हाला एक उदाहरण देतो ते सोडवा पाहू.

## अध्ययन पत्रक 6

## घटनांचा कालानुक्रम

**कृती 1:** मुलांनो तुमच्या कुटुंबात घडलेल्या प्रमुख घटना कालानुक्रमे लिहा? उदा. तुमच्या कुटुंबातील सदस्यांचा जन्म, घरामध्ये साजरा केला जाणारा सण समारंभ इत्यादी.

| अ.नं. | इ.स. | घटना | घटनेशी संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|
| | | | |

**शिक्षक:** सर्वांनी व्यवस्थित लिहिलं काय? आता तुम्हाला घटनाक्रम म्हणजे काय हे माहित झाले आहे चला आपण मध्यकालीन भारताच्या इतिहासातील इतर राज्ये तसेच त्यांचा कारभार इत्यादी घटना क्रमानुसार समजावून घेऊया.

**मध्ययुगीन भारतातील प्रमुख घटनाक्रम**

| अ.नं. | इ. स. | घटना | घटनेला संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|
| 1 | 1000-1027 | महंमद गझनीचे हल्ले | मोहम्मद गझनी |
| 2 | 1191-1192 | पहिली आणि दुसरी तरायनची लढाई | पृथ्वीराज चव्हाण आणि महंमद घोरी |
| 3. | 1206 | दिल्ली सुलतानाच्या राजवटीची स्थापना | कुतुबुद्दीन ऐबक |
| 4 | 1308-1309 | अल्लाउद्दीन खिलजी ची दक्षिण भारतातील स्वारी | अल्लाउद्दीन खिलजी मलीक कपूर |
| 5 | 1327 | दिल्लीहून दौलता बादला राजधानीचे स्थलांतर | मोहम्मद बिन तुघलक |
| 6 | 1336 | विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना | हरिहर आणि बुक राजे |
| 7 | 1347 | बहामनी साम्राज्याची स्थापना | हसन गंगु |
| 8 | 1398 | भारतावर तैमूर चा हल्ला | तैमुर |
| 9 | 1489 | आदिलशहाच्या राज्यांची स्थापना | युसूफ आदिल खान |
| 10 | 1526 | पहिले पानिपतचे युद्ध | बाबर आणि इब्राहीम लोदी |
| 11 | 1556 | पानिपतचे दुसरे युद्ध | अकबर आणि हेमू |
| 12 | 1565 | तालीकोटचे युद्ध | रामराय आणि चार शाह्या |
| 13 | 1582 | दिने इलाही ची स्थापना | जलालुद्दीन मोहम्मद अकबर |
| 14 | 1686 | विजापूरचे वंश | आलमगीर (औरंगजेब) सिकंदर आदिलशहा |
| 15 | 1707 | औरंगजेबाचा मृत्यू | औरंगजेब |

मध्ययुगीन कालानुक्रम माहितीपत्रकात दिलेली वेळ, घटना आणि संबंधित व्यक्ती ओळखा आणि होऊन गेलेल्या घटना काला क्रमानुसार समजावून घ्या. आता मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो त्याची उत्तरे द्या पाहू.

## अध्ययन पत्रक 7

**कृती 1:** खालील घटना दिलेल्या रिकाम्या जागेत कालक्रमानुसार लिहा.

1. पानिपतची पहिली लढाई
2. विजयनगर साम्राज्याची स्थापना
3. तालीकोटचे युद्ध
4. तेरेन युद्ध
5. अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिण भारतातील स्वारी

1. ____________________
2. ____________________
3. ____________________
4. ____________________
5. ____________________

**कृती 2:** कालगणनेच्या रेषे वर दिलेल्या घटना लिहा.

1. बहुमनी राज्याची स्थापना   2. तैमुरी हल्ले

3. दिन ए इलाही ची स्थापना   4. दुसरे पानिपतचे युद्ध



1000 सा.श.  1100  1200  1300  1400  1500  1600  1700 सा.श.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

| |
|---|
| शिक्षक सही |

## अध्ययन अंश 5

# उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटनांमधील अंतर संबंध.

**अध्ययन निष्पत्ती:** उत्तर आणि दक्षिण भारतातील ऐतिहासिक घटनामधील अंतर संबंध स्पष्ट करणे.

मुलांनो,

जेव्हा आपण एखाद्या भागात राहतो तेव्हा आपण एकमेकांना कोणत्या ना कोणत्या संबंधाने ओळखतो. ते आपल्याला ओळखतात. काही घटना देखील आपले नाते वाढवू शकतात किंवा खराब करू शकतात. उदा. आपल्या कुटुंबात सर्वांचे चांगले नाते आहे पण संपत्तीसाठी आपल्यात भांडणे होतात आणि नाती बिघडतात .

मुलांनो, त्याचप्रमाणे कृष्णा आणि तुंगभद्रा नद्यांच्या खोऱ्यात विजयनगर आणि बहामनी राज्याच्या दरम्यान सुपीक प्रदेश होता. दोन्ही राज्यांमध्ये त्यांच्या वर्चस्वासाठी नेहमीच वाद होत आले आहेत. त्याचप्रमाणे उत्तर भारतातील अनेक राज्ये संपत्ती आणि प्रादेशिक विस्तारासाठी दक्षिणेकडील राज्य घराण्यावर युद्ध करत होती. त्या व्यतिरिक्त त्यांचे वैवाहिक संबंध आणि व्यवसायिक व्यवहार आहेत. इथे उल्लेखनीय बाब म्हणजे ही घराणी नाते नसतानाही आपल्या अस्तित्वासाठी लढले. आता मी तुम्हाला एक कृती रेतो ती पुर्ण करा. ज्यामुळे परस्पर संबंध करते वाढतात हे तुमच्या लक्षात येइल.

## अध्ययन पत्रक 8

**कृती 1:** मुलांना तुमच्या पाठ्य पुस्तकाचा आधार घेऊन उत्तर भारत आणि दक्षिण भारतातील कोणकोणत्या राज्यांचे दक्षिण भारतातील कोणकोणत्या राज्यांबरोबर कोणत्या प्रकारचे संबंध जोपासले होते ते समजावून घेऊ या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**कृती 2:** मुलांनो तुमचे गाव व शेजारील गावांनी कोणत्या प्रकारचे संबंध जोपासले आहे ते विचारा व समजावून घेऊ नंतर वर्गात चर्चा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**विचार करा! आणि असे का याचा अर्थ समजून घ्या.**

तुमच्या रोजानऱ्यां बरोबर कोणत्या प्रकारचे संबंध जोपासले आहेत समजावून घेऊन त्याचे महत्व समजून घ्या.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

**अध्ययन अंश 6**

## मध्ययुगीन शासन पद्धती

**अध्ययन निष्पत्ती:** मध्ययुगीन काळातील शासान पध्दती समजून घेणे.

आपण कोणतेही एक राज्य घेतले तर सर्व कामे एकट्यानेच करावयाची म्हटली तर अशक्य आहे म्हणून आपण एक एक काम वाटून घेऊन त्या प्रकारे करू शकतो. उदा. आई स्वयंपाक घर सांभाळते, वडील घरची जवाबदारी आणि तुमचा अभ्यास घेतात. त्याचप्रमाणे आपण आपल्या इतिहासाचा अभ्यास करताना त्यांची प्रशासकीय पद्धती कशी होती ? ते कोण पाहत होते? या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. प्रथम आपण आपल्या गावाबद्दल बोलूया.

**शिक्षक:** मुलांनो तुमच्या गावात ग्रामपंचायत अथवा नगरपंचायत आहे का ? येथील प्रशासकीय काम कोण पाहते ?

**मुले:** आमच्या गावातील पंचायत सदस्य, ग्राम विकास अधिकारी, अध्यक्ष, लिपिक इ.

**शिक्षक:** ते तुमच्या गावात कोणकोणती कामे करतात ते सांगा पाहू ?

**मुले:** गटार बांधणे, घर बांधून देणे, पाणी पुरवठा करणे तसे घरफाळा व पाणीपट्टी भरून घेण्याचे काम करतात.

**शिक्षक:** तुम्ही जर तुमच्या गावातील घरफाळा किंवा पाणीपट्टी भरली नाही तर ते काय करतात ?

**मुले:** पाणीपुरवठा बंद करतात व दंड वसूल करतात.

**शिक्षक:** ठीक आहे. तर आज मी तुम्हाला य संबंधित एक काम सोपवितो ते उद्या सर्वानी पूर्ण करून येणेचे आहे.

**अध्ययन पत्रक 9**

**कृती 1:** तुमच्या गावातील किंवा नगर पंचायत ग्राम विकास अधिकारी, मुख्याधिकारी लिपिक यांच्यापैकी एकाला भेटून ते कोणते काम करतात ? प्रशासकीय काम फक्त कशा प्रकारे चालवतात ? याविषयी वर्गात येऊन माहिती सांगू शकतात.

**मुलांनी भेट देऊन मिळवलेली माहिती वर्गामध्ये सर्वांबरोबर चर्चा करावी.**

**शिक्षक:** तुम्ही तुमच्या गावातील अधिकारी करा प्रकारे प्रशासन चालवतात याविषयी समजून घेतले आहातय ना? आता आपण मध्ययुगीन काळात विजयनगर, दिल्लीये सुलतान आणि मुगलकाळात प्रशासनात अनेक सुधारणा केल्या होत्या त्या सुधारणा कोणत्या? कशा झाल्या याबद्दल समजावून घेऊ.

**वाचूया व अर्थ समजावून घेऊया.**

**इक्ता पद्धती:** गुलाम वंशजाची प्रशासन व्यवस्था लागू करताना इक्ता पद्धतीच्या अंतर्गत राज्य मोठ्या आणि लहान घटकांमध्ये विभागली गेली आणि विश्वासू सैनिकांना प्रशासक म्हणून नियुक्ती दिली गेली तर काही पद्धत वेतन आधारित होती फिरोज शहा तुघलकच्या काळात जमीन वाटप वंशपरंपरेने चालू झाली. इक्ता म्हणजे जमिनीचा महसूल वसुलीची एक पद्धत.

**मनसबदारी पद्धती:** अकबराने नवीन अमलात आणलेली ही पद्धत होय. मनसब म्हणजे श्रेणी आणि मान अशा मनसबदार यांना त्यांच्याकडे असणाऱ्या सैन्यांच्या संख्येच्या आधारावर श्रेणी देण्यात येत असे. अतिशय कमी दहा सैनिक तसेच जास्तीत जास्त 12000 सैनिक होते. प्रत्येक मनसब व्यवस्थापनासह आर्थिक वसुली कायदा आणि सुविधा व्यवस्था राखणे महत्त्वाचे होते. बहुतेक मनसबदार विदेशी होते. त्यांना पगार हा पैशाच्या स्वरूपात दिला जात होता.

**नायकत्व पद्धती:** विजयनगर साम्राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेला नायकत्व पद्धती असे म्हणतात. प्रत्येक प्रांताला एक नायक नेमणूक करण्यात येत होती. यांना आर्थिक वसुली, सैन्याची देखभाल, सुव्यवस्था त्याचबरोबर गरज भासल्यास राज्याला सैन्यपुरवठा करावा लागे एवढेच नव्हे तर सर्वांच्या प्रगतीसाठी कृषी पद्धती, पाणीपुरवठा, कला आणि वास्तू तसेच लोक कल्याणकारी योजनांना प्रोत्साहन देत होते.

## अध्ययन पत्रक 10

# मध्ययुगीन भारतातील प्रशासकीय पध्दती

**कृती 1:** वरील प्रशासकीय पद्धती लागू झालेल्या प्रदेशांचे नकाशे खाली दिली आहेत. त्यांचे आपण वाचन करूया व समजावून घेऊया.





**कृती 2:** वरील नकाशांचे निरीक्षण करून भारताच्या नकाशात मनसबदारी इक्ता नायकत्व पद्धती लागू असलेले प्रदेश ओळखा.



**कृती 3:** इक्ता मनसबदारी पद्धती तसेच नायकत्व पद्धतीमध्ये दिसून येणाऱ्या समान मुद्यांची यादी करूया.

| इक्ता पद्धत | मनसबदारी पद्धत | नायकत्व बद्दल |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

मुलांनो,

आम्ही वरील कृती करण्या बरोबर तेथील कामकाज कसे होते ? हे चांगल्या प्रकारे समजावून घेतले. मुलांनो इतिहास समजावून घेतेवेळी तेव्हा तेथील लोकांचा व्यापार, देवाण-घेवाण कसे करत होते? काय विकत होते? कोठे विकत होते ? हे आपण समजावून घेणे फार महत्त्वाचे आहे. आता आपण सुरुवातीस आपल्या आजूबाजूचा व्यापारी संकुलात व्यवस्था कशी आहे ते समजावून घेऊया व नंतर पुढे जाऊया.

मुलांनो, तुम्ही आपल्या गावचा किंवा इतर गावचा बाजार पहिला आहे काय?

**मुले:** पाहिला आहे सर, आमच्या गावात मोठे व्यापार संकुल आहे तेथे शेळ्या-मेंढ्या, जनावरे, भाजीपाला, कडधान्ये हे सर्व विकले जाते.

**शिक्षक:** तेथे त्या सर्व वस्तू कोण आणते ? तेथे कोणीही आणून आपल्याला वस्तू विकू शकतात का ? ते विकण्यासाठी काही नियम आहेत का ?

मुलांनो, आपण आपल्या जवळच्या कोणत्याही एका बाजाराला किंवा व्यापार व्यापार संकुलाला भेट देऊया व तेथील कामकाजाची यादी करूया. चला, आपण उद्या या विषयी चर्चा करुया.

**शिक्षक:** आम्ही आपल्या जवळच्या बाजारा विषयी चर्चा करून समजावून घेतले आहे. आज आपण मध्यकालीन भारतीय व्यापार व्यवस्था आणि सुधारणे विषय समजावून घेऊन काही कृती करूया. आता आपण त्याच्या विषयी थोडीशी माहिती वाचून, समजावून घेऊ.

## अल्लाउद्दीन खिलजीच्या व्यापारी सुधारणा

अल्लाउद्दीन खिलजीच्या प्रमुख सुधारणांमध्ये बाजार समिती नियंत्रण धोरण अतिशय महत्वाचे आहे. या धोरणा अंतर्गत अल्लाउद्दीन खिलजीने पुढील चार प्रकारच्या समितीचीबाजार स्थापना केली होती.

- **गल्ला बाजार /अनाज मंडी (धान्य बाजार):** या बाजारांमध्ये सर्व प्रकारची धान्ये योग्य किमतीमध्ये विकली जात असत. ही बाजारपेठ व्यवस्थितपणे चालण्यासाठी धान्य रूपामध्ये कर वसुली केली जात असे. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले धान्य व बाजारपेठेमध्ये विकल्या जाणाऱ्या धान्याच्या साठी किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली होती. या बाजार व्यवस्थेमध्ये मापने व वजन यामध्ये कोणतीही फसवणूक होऊ नये यासाठी एक नियमावली बनविण्यात आली होती. एखादे वेळी अशी फसवणूक झाल्यास कठीण शिक्षेची तरतूद करण्यात आली होती.
- **सराय –इ– अदल (वस्त्र बाजार):** ही एक तयार वस्तू विक्रीची व्यवस्था होती. याठिकाणी विविध प्रकारच्या वस्त्रांची निश्चित केलेल्या दरामध्ये विक्री केली जात असे. येथे वस्त्रासोबतच कंदमुळे, तूप, तेल इत्यादी पदार्थांची खरेदी विक्री होत असे. या ठिकाणी व्यापार करण्यासाठी प्रत्येकाला नोंदणी करणे सक्तीचे होते.
- **गुलाम व प्राण्यांचा बाजार:** या बाजारपेठेमध्ये गुलाम, अश्व, त्यासोबत इतर प्राण्यांची खरेदी–विक्री होत असे. या व्यवस्थेमध्ये सरकारी नुकसान करणाऱ्या दलालांना दूर ठेवण्यात अल्लाउद्दीन खिलजी यशस्वी ठरला.
- **सामान्य बाजार:** वरील बाजारांमधील वस्तू व अतिरिक्त इतर इतर वस्तू, भाजीपाला, खाद्य पदार्थ, पादत्राणे, टोपी, अलंकार इत्यादी वस्तूंची खरेदी विक्री निश्चित केलेल्या दराप्रमाणे केली जात होती.

या व्यवस्थेमुळे दलालांचा हस्तक्षेप न होता प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून सरकारी धान्य खरेदी करत असल्यामुळे भ्रष्टाचार मुक्त व्यवहार होऊ लागले. प्रत्येक वस्तूच्या निश्चित केलेल्या विनिमयाच्या दरामुळे सर्व स्तरातील नागरिकांना अनुकूल झाले. त्याचबरोबर राज्याची आर्थिक घडी नीट बसली. या कालावधीमध्ये दुष्काळाची परिस्थिती उद्भवली नाही. ही गोष्ट नोंद घेण्यासारखी आहे.

## अध्ययन पत्रक 11

**कृती 1:** आम्ही अल्लाउद्दीन खिलजीच्या व्यापार व्यवस्थेविषयी समजावून घेतले आहे. आता आपण त्यावेळची व्यापार व्यवस्था तसेच आजच्या व्यापार व्यवस्थेमधील समानता व फरक लिहू.

| समानता | फरक |
|---|---|
| | |

**कृती 2:** व्यापार संकुलामध्ये विक्रीकर दर कमीत कमी किती असायला हवा याविषयी शिक्षकांबरोबर वर्गामध्ये चर्चा करा.

**कृती 3:** विचार करून उत्तरे देऊ या?

**व्यापार करण्यासाठी वजन आणि माप याची आवश्यकता आहे का ? विचार करा आणि उत्तरे द्या.**

**कृती 4:** तुमच्या गावात स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तू रास्त दरात मिळतात का ? वर्गमित्रा बरोबर चर्चा करा.

**कृती 5:** खाली दिलेल्या काही वस्तूचे सामान्य व्यापार संकुलात आणि स्वस्त धान्य दुकानातील दार याबाबत जाणून घेऊन लिहा.

| वस्तू | स्वस्त धान्य दुकामातील दर | सामान्य व्यापार संकुळा तील दर |
|---|---|---|
| तांदूक | | |
| गहू | | |
| नाचणा | | |
| सूाखर | | |
| तेल | | |

**कृती 6:** तुमच्या घरातील ज्येष्ठ व्यक्तीसोबत आपल्या परिसरातील बाजारास भेट देऊन तेथील दलाली संदर्भात आपला अभिप्राय लिहा.

______________________________

______________________________

______________________________

मुलांनो, पहा आम्ही सध्याची विक्रीची व्यवस्था आणि त्यावेळची विक्री व्यवस्था कशी होती ? हे आपण शिकलो आहोत. पूर्वीची पद्धत होती त्यामध्ये महसूल, व्यापार आणि पाणीपुरवठा योजनेमध्ये देखील अनेक बदल केले आहेत त्या अगोदर आम्ही. आपल्या गावा बद्दल समजावून घेऊया.

**शिक्षक:** मुलांनो, गावात तलाव, धरण, कालवे, नद्या आहेत का ?

**मुले:** सर आमच्याकडे एक मोठा तलाव आहे.

**शिक्षक:** तो तुम्ही पाहिला आहे का ? ठीक आहे मग माझ्या काही प्रश्नांची उत्तरे द्या.

**प्रश्न 1:** तुमच्या गावातील तलाव कोणी बांधला आहे ?

**प्रश्न 2:** तलावापासून तुमच्या गावातील लोकांना काय फायदा होतो ?

आत्ताच आपण आपल्या गावातील नदी. कालवे यांच्या उपयोगाविषयी शिकला आहात ते सर्व पाणीपुरवठ्यासाठी फार उपयोगी आहे. त्याचप्रमाणे मध्ययुगीन काळात फिरोजशहा राजाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी अनेक पाणीपुरवठा योजना आखल्या होत्या, त्या समजावून घेऊन काही कृती करूया.

## फिरोजशहा तुघलक काळातील पाणीपुरवठा योजना

फिरोज शहा यांनी राज्य विस्तारापेक्षा राज्यांची आर्थिक परिस्थितीचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी अनेक कार्ये केली, अनेक नवीन योजना आखल्या. त्यामध्ये पाणी पुरवठा कालव्याची निर्मिती मुख्य होती.

a. यमुना नदी पासून हिस्सार नदीपर्यंत

b. सतलज नदी पासून घागरा नदी पर्यंत

c. घागरा नदी पासून फिरोजाबाद्पर्यंत

d. मांडवी नदी पासून शिरूर डोंगरातून हसनीपर्यंत

या पाणीपुरवठा योजनेमुळे यांना भारताच्या कालवा पाणी पुरवठ्याचे पितामह म्हणून ओळखले जाते. हे त्या काळातील शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी फार उपयुक्त ठरले. त्यावेळी कृषीकर उत्पन्नाच्या 1/10 इतका होता.

**शिक्षक:** शिक्षक आता आपण फिरोजशहा च्या पाणीपुरवठा योजनेविषयी समजावून घेतले आहे. आता आपण त्याच्याविषयी कितपत समजावून घेतले आहे त्यासाठी काही कृती करून पाहुया.

**अध्ययन पत्रक 12**

**कृती 1:** फिरोजशहा तुघलक काळ तसेच आजच्या काळातील शेतकऱ्यांसाठी योजना यामधील समान गोष्टींची करा.

1. ____________________
2. ____________________
3. ____________________
4. ____________________
5. ____________________
6. ____________________

**कृती 2:** शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणेचा उद्देश आणि त्यांचा परिणाम वर्गामध्ये शिक्षकांच्या मदतीने तुमच्या मित्रांबरोबर चर्चा करा.

____________________

____________________

____________________

____________________

____________________

**कृती 3:** जमिनीचे मापन का करतात? तुमचे घर, शेत, बाग यांचे कसे मापन करतात ? हे गावातील वयस्कर नागरिकांबरोबर चर्चा करा समजावून घ्या व वर्गात चर्चा करा.

**कृती 4:** गावातील महसूल अधिकाऱ्यांना भेन महसूल वसूल करणे बाबत समजावून घेऊन लिहा.

मुलांनो, पाणीपुरवठा योजना या शेतकऱ्यांसाठी कशा वरदान आहे हे आपण समजावून घेतले. देशात पाणीपुरवठा सोयी चांगल्या असायला हव्यात. त्या देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी मदत करतात.

**विचार करा:** पाणीपुखठा योजना नसतील तर काय इोईल? चर्चा करा.

ठीक, मध्ययुगीन काळामध्ये अनेक राज्यांनी आपले योगदान दिले आहे. त्या योजना आजही आपण उपभोगतो. त्यांनी इतर क्षेत्रातही दिलेले योगदान याची माहिती करून घ्या.

आता प्रश्न विचारू का?

मुलांनो, तुम्ही राहात असलेले घर स्वतःचे की भाड्याचे ?

**मुले:** सर आता आम्ही जिथे राहतो ते स्वतःचे घर आहे, याच्या अगोदर आम्ही भाड्याच्या घरात होतो.

**शिक्षक:** ते तुमचे स्वतःचे किंवा भाड्याचे हे कसे सांगू शकता ?

**मुले:** ते आमच्या वडिलांनी मिळवलेले आहे.

**शिक्षक:** बरोबर त्याला काहीतरी पुरावे असतील ना ? आम्ही सर्वजण राहात असलेले घर, शेती, बाग, मळा हे सर्व आमच्या मालकीचे आहे. हे समजून घेण्यासाठी काही कागदपत्रे करून घेतली जातात. ती कागदपत्रे कोणती ? तुमच्या घरातील अथवा शेजाऱ्यांना विचारा व त्यांची यादी करा.

मुलांनो, आपण आता दाखले यांविषयी समजावून घेतले आहे. आता आपण शेरशाह सूरी याच्या राज्यातील भूमापन पद्धतीबद्दल समजावून घेऊ.

## कसेल तो मालक

शेरशहा सुरी यांने शेत जमिनीची मोजणी व त्याची कागदोपत्री नोंदीसाठीची पद्धती अंमलात आणली. जमिनीच्या मोजमापासाठी सिकंदर गज या एककाचा वापर केला. सोळाव्या शतकापूर्वी अशा प्रकारचे कोणतेही प्रमाणित एकक वापरात नव्हते. त्यांनी जमीन व पिकांच्या प्रकाराच्या आधारावर कर आकारणीसाठी उच्च प्रतीची जमीन, मध्यम प्रतीची जमीन व कमी प्रतीची जमीन असे वर्गीकरण करून कर आकारणी केली.

शेतकऱ्यांना प्रथमच ते कसत असलेल्या जमिनीची मालकी सरकार दरबारी नोंद करून, पट्टा या नोंद पुस्तकांमध्ये नोंदी करून त्याची हक्क पत्रे देण्यात आले. जमिनीची मालकी कायम राहण्यासाठी प्रति वर्ष न चुकता कर जमा करावा लागत असे. शेतकरी कबुली पत्राद्वारे पट्टा स्वीकारत असत. हा करार धान्य रूपी किंवा रोखीने द्यावा लागत असे. दुष्काळाच्या काळामध्ये जमिनीच्या करांमध्ये सवलत दिली जात असे.

## अध्ययन पत्रक 13

**कृती 1:** सध्याच्या काळात भूदाखले संग्रहात कोण करतो ? त्याचे उपयोग काय ? याच्या विषयी चर्चा करूया.

**कृती 2:** तुमचा आई-वडिलांबरोबर संपत्तीची नोंदणी कशी करतात ? याविषयी चर्चा करा.

**कृती 3:** शिक्षक तुम्हाला एक जमिनीचे कागदपत्रे दाखवितात निरीक्षण करा व त्यातील प्रमुख मुदूयांची यादी करा.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

## अध्ययन अंश 7

# सामाजिक व धार्मिक परिस्थिती

**अध्ययन निष्पत्ती:** मध्ययुगीन काळात सामाजिक, धार्मिक झालेल्या बदलांचे वर्णन करतील.

मुलांनो, पुरातन काळापासून आपल्या सामाजिक आणि अनिष्ट पद्धत मोडून काढण्यासाठी अनेक साधुसंतांनी प्रयत्न केलेला आहे. त्याकरिता त्यांनी वेगवेगळे मार्ग निवडलेले आहेत. आता देखील अनेक जण अशा कामात व्यस्त आहेत. सुमारे 12 व्या शतका पासून 17 व्या शतकापासून अनेक महान व्यक्ती सामाजिक सुधारणांचा प्रयत्न करत होते. आता आपण त्यांच्या सारख्या महान व्यक्ती विषयी थोडी समजावून घेऊ. या अगोदर तुमच्या गावात अशा पद्धतीने फिरणारे साधू-संत आहेत काय ? ते कोणते कार्य करतात ? याविषयी लिहा.

मुलांनो, तुमच्या गावात किंवा शेजारील गावांमध्ये प्रबोधन करणाऱ्या व्यक्तींचे निरिक्षण केला आहात का?

**मुले:** होय मॅडम, आमच्या गावात काहीजण तंबोरा, बासरी वाजवत गाणी गात, प्रबोधन करत फिरतात. काही जण मोराचे पंख घेऊन शुभ-अशुभ सांगत फिरतात.

### भारतीय समाजामध्ये सुफी संतांचे योगदान

सुफी पंथांचा उगम पार्शिया या देशात झाला. बाराव्या शतकाच्या शेवटी ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती यांच्या आगमना सोबत भारतामध्ये याचा प्रवेश झाला. सुफी पंथांचे संस्थापक लोकरी कपड्यांचा वापर करत असत. अरबी भाषेमध्ये 'लोकर' या शब्दाला 'सूफ' असे म्हणतात. यावरूनच या पंथाचे 'सूफी पंथ' असे नामकरण झाले. 'सूफी पंथ' हा इस्लाम अंतर्गत येणाऱ्या आचार-विचारांचे पालन करतो. सुफी पंथीय लोक आपली भक्ती गायन व नृत्य याद्वारे अर्पण करतात. या पंथांचा भारतीय समाजावर खूप मोठा प्रभाव दिसून येतो. उदा. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा उदय, विविध मतप्रवाहांशी सुसंवाद, उर्दू व इतर साहित्य भारतीय भाषेमध्ये सुफी साहित्याचा विकास, जसे कबीरांचे दोहे, गालीबच्या गझल, संत शिशूनाळ शरीफ यांची तत्वे.

## अध्ययन पत्रक 14

**कृती 1:** सुफी संतांनी समाजातील कोणकोणत्या कुप्रथा सुधारण्याचा प्रयत्न केला ?

**कृती 2:** खाली दिलेली चित्रे सुफी संतांशी संबंधित आहे. तुम्ही त्यांच्या बद्दल माहिती समजावून घेऊन तुमच्या मित्रांसोबत चर्चा करा.



1. शेख सलिम चिस्ती यांची समाधी



2. ख्वाजा बंदेनवाज दर्गा



3. कुतुबमिनार

**कृती 3:** खालील दिलेल्या चित्राचे काळजीपूर्वक निरीक्षण करा व उत्तर द्या.



वरील चित्र पाहिल्यानंतर तुम्हाला कोणत्या चळवळीची आठवण होते ? आणि ती चळवळ लोकप्रिय होण्याची कारणे तुम्ही तुमच्या वर्ग मित्रांबरोबर चर्चा करा.

**कृती 4:** खालील यादीमधील भक्ती पंथांचे तत्वज्ञ व त्यांची तत्वे यांच्या जोड्या जुळवा.

| तत्वत | | तत्व | |
|---|---|---|---|
| 1. | शंकराचार्य | (a) | विशिष्टाद्वैत |
| 2. | बसवेश्वर | (b) | द्वैत |
| 3. | मध्वाचार्य | (c) | अद्वैत |
| 4. | रामानुजाचार्य | (d) | शक्ती विशिष्टाद्वैत |

**कृती 5:** दिलेल्या धार्मिक सुधारकोची तत्वे योडण्यान निहा.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

## अध्ययन अंश 8

# युद्धाची कारणे आणि परिणाम

**अध्ययन निष्पत्ती:** युद्धाची कारणे व परिणाम समजून घेतात

मुलांनो, इतिहासाचा अभ्यास करताना आम्ही पाहीले की राज्याचे प्रशासन, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवन याबरोबरच साम्राज्य विस्तारासाठी आक्रमण करून संपत्ती व अधिकारासाठी प्रयत्न करीत होते. परंतु काही राजघराणी शांती समाधानाच्या आधारे राज्य चालवत होते, थोड थांबा. अरुण आणि हेमंत काहीतरी बोलत आहेत ते आपण पाहूया.

**अरुण:** हेमंत आज टिव्ही पाहिलास ?

**हेमंत:** नाही, का ?

**अरुण:** रशिया आणि युक्रेन या दोन देशात युद्ध चालले आहे.

**हेमंत:** होय? युद्ध कशासाठी चालू आहे ?

**अरुण:** ते कशासाठी मला निश्चित माहित नाही. परंतु तेथे असणारे सैनिक एकमेकांना ठार मारत आहेत. एवढेच नव्हे तर विमानातून बॉम्ब टाकत आहेत. तेथे असणारे अनेक सैनिक मरत आहेत. इमारती क्षणात कोसळत आहेत. असेच होत राहिल्यास तिसऱ्या महायुद्धाची शक्यता नाकारता येत नाही.

**हेमंत:** होय, अरुण असेच चालू राहिले तर कोणीही जिवंत राहणार नाही असे वाटते. त्यापासून त्यांना काय फायदा ?

**अरुण:** याविषयी मला फार माहिती नाही. चल आपण याविषयी आमच्या सरांना विचारूया.

**अरुण आणि हेमंत:** सर हे देश का युद्ध करत आहेत ? विनाकारण लोकांना त्रास देत आहेत राजे-महाराजांच्या काळात सुद्धा अशीच युद्धे होत असत का सर ?

**शिक्षक:** मुलांनो, तुमची उत्सुकता पाहून मला फार आनंद होत आहे या सांगतो परंतु मी तुम्हाला तुमच्या पुस्तकातील मध्ययुगीन युद्धाविषयी सांगतो

**अरुण आणि हेमंत:** सर सांगा.

**शिक्षक:** मुलांनो, प्राचीन काळापासून मानवी विकासाबरोबर युद्धे होत आली आहेत. त्यांची कारणे ही वेगवेगळी आहेत. काही युद्धे राज्य विस्तार, संपत्तीसाठी झाली आहेत. या युद्धांमुळे अनेक साम्राज्यांचे पतनही झाले आहे. आता मी तुम्हाला एक माहिती पत्रक देतो ते वाचा.

आता आपण मध्ययुगीन काळामध्ये अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वाऱ्या, पानिपतचे पहिले युद्ध व तालिकोटचे युद्ध याविषयी समजून घेऊया.

**अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण भारतावरील स्वाऱ्या:**

मंगोली आक्रमणांना समर्थपणे तोंड देत, इतर युद्धामध्ये यशस्वी ठरलेला अल्लाउद्दीन खिलजी हा त्याच्या समर्थ अशा सैन्य उभारणीमुळे यशस्वी ठरला आहे. मंगोल आक्रमणांना थोपवून उत्तर भारतातील अनेक राज्ये जिंकल्यानंतर त्याने आपले सैन्य घेऊन सेनापती मलिक काफूर याला दक्षिण भारतावर पाठवले. मलिक काफुरने सन 1308 ते 1311 या कालावधीत देवगिरीच्या रामदेवराय, वारंगलाचा राजा प्रताप रूद्रदेव व इतर राज्याकडून मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा करुन दिल्लीला नेली.

**पानिपतचे पहिले युद्धः** मोगल सम्राट बाबरने मध्य आशियात सैन्य उभारणी करून सन 1526 मध्ये पानिपत या ठिकाणी दिल्लीचा सुलतान इब्राहीम लोदी याच्या विरुद्ध युद्ध केले. बाबरने आपल्या युद्ध कौशल्याने 22000 सैनिकांसह इब्राहीम लोदीच्या एक लाख सैन्यांचा पराभव केला. त्याचा परिणाम म्हणून मुगल भारतात आपली सत्ता स्थापन करू शकले.

**तालिकोटचे युद्धः** (रक्कसतंगडीची लढाई) विजयनगर साम्राज्याचा जावई रामराय विरुद्ध विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही व बिदरची बरीदशाही या चार शाह्या यांनी कृष्णा नदीच्या दक्षिणेला 12 किलोमीटर अंतरावरील बन्नीहट्टी या ठिकाणी 23 जानेवारी 1565 रोजी झालेल्या लढाईत विजयनगरच्या सैन्याचा पराभव केला. सुमारे दोनशे वर्षे दक्षिण भारतावर प्रदीर्घ सत्ता गाजवणाऱ्या विजयनगर साम्राज्याच्या पतनास हे युद्ध कारणीभूत ठरले.

## अध्ययन पत्रक 15

**कृती 1:** आत्ता तुम्ही माहिती वाचली आहात. आता खाली दिलेली चित्रे पाहूया व विचार करूया. तुझा अभिप्राय लिही.





**कृती 2:** मुलांनो दिलेल्या नकाशाच्या सहाय्याने अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण भारतावर केलेल्या हल्ल्याचा मार्ग आणि प्रमुख स्थळे ओळखुया.



**कृती 3:** विजयनगरच्या पतनास कारणीभुत झालेल्या तालिकोटच्या युध्दावर टीपा लिहा.

**कृती 4:** युध्दे होण्याची कारणे कोणती ती कशाप्रकारे टाळली जाऊ शकतात? तुमचा अभिप्राय लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

शिक्षक सही

### अध्ययन अंश 9

## जलमार्गाचा शोध

**अध्ययन निष्पत्ती:** जलमार्गाच्या शोधा साठी कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अर्थ समजावून घेणे.

मुलांनो, आपण एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी मार्ग असणे फार महत्त्वाचे असते. तो वायुमार्ग, तसेच जलमार्ग कोणताही असो परंतु युरोपियन जलमार्गाच्या सहाय्याने येईपर्यंत भारतात पोहोचण्यासाठी कोणताही जलमार्ग माहित नव्हता, ते जलमार्गाच्या सहाय्याने वेगवेगळ्या देशांमध्ये कसे पोहोचले ते पाहूया.

लवंग, खादीचे कपडे काय करत आहेत ? या आपण ऐकुया.

**लवंग:** मी लवंग माझे मूळ स्थान पश्चिम किनारा. तुझे गाव कोणते ?



**खादीचे कपडे:** मूळ गाव देखील भारत आम्ही बंगाल माझे मूळ स्थान गुजरात आणि दख्खन देखील आहे.

**लवंग:** तु भारतीय? तु युरोपला कसा आलास ?

**खादीचे कपडे:** फार पूर्वीपासून युरोपियन आणि अरेबियन राजघराण्यांना मी फार आवडत होतो. मी पहिल्यांदा अरेबियाला येऊन नंतर युरोपला आलो. भारतीयांनी मला पहिल्यांदा अरेबियनना विकले. अरबांनी युरोपियनांनी विकले. मलाच नव्हे तर अलंकारिक वस्तू, मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, मिरे, मलमली कपडे अशा अनेक वस्तू आल्या आहेत.

**मिरे:** तुमच्यापेक्षा अगोदर युरोपीयला मी आलो आहे. मला इथे फार मागणी आहे. मला मसाल्याची राणी असे म्हणतात. सोन्यापेक्षा मला जास्त मागणी आहे या देशात.

**खादीचे कपडे:** कोणकोणत्या देशांनी तुला स्वीकारले आहे?

**मिरे:** अरेबिया, फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगीज, इंग्लंड, स्पेन, इटली इत्यादी देश माझ्यासाठी युद्ध केले आहेत. एवढेच नव्हे तर आपल्या सैनिकांना आणि कामगारांना पगाराच्या स्वरूपात मला दिली जात होते त्यांच्या देशाच्या चलनापेक्षा मला मागणी जास्त आहे.

**खादीचे कपडे:** आम्ही सर्वजण एकाच भागातल्या आहोत. कोणत्या एका मार्गाने येऊन युरोपमध्ये आलो दुसऱ्या ठिकाणी येऊन आपले भांडण नको. आम्हा सर्वांना किंमत आहे. कोणालाही किंमत दिली तर ती आपल्या देशाला दिल्यासारखी आहे त्यासाठी आजही भारताशी व्यापार करू इच्छितात.

## अध्ययन पत्रक 16

**कृती 1:** वरील संवाद ऐकला आता आपण खालील प्रश्नांची उत्तरे देऊन या.

1. भारताबरोबर प्राचीन काळापासून व्यापार संबंध ठेवलेले कोण ?

2. युरोप मध्ये कोणत्या वस्तू ला जास्त किंमत होती ?

3. स्वत:ला राणी कोण समजते ? असे का म्हणतात ?

4. भारतातील मसाल्यांचे पदार्थ विकून कोणत्या देशाने जास्त फायदा घेतला ?

5. भारताच्या वस्तू .........................खंडाच्या वेगवेगळ्या बाजारपेठेत होत्या.

6. खादीचे कपडे सोबत कोण कोणत्या वस्तू युरोपमध्ये पोहोचल्या ?

**कृती 2:** आज भारतातून दुसऱ्या देशाला निर्यात होणाऱ्या व दुसऱ्या देशातून भारताला आयात होणाऱ्या वस्तूंची यादी करा.

| भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तू | दुसऱ्या देशातून आयात होणाऱ्या वस्तू |
|---|---|
| | |

मुलांनो,

प्राचीन काळी अरबी देशांमध्ये तो भाग वाळवंटी प्रदेश असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे उत्पादन मिळत नव्हते. तेथील जीवन खूप कष्टदायक होते. तेथील लोक शेती व्यतिरिक्त इतर कामे करत असत. व्यापारासाठी ते आशिया व युरोप खंडाशी संपर्कात असत. त्यांनीच भारतातील मसाले पदार्थांची ओळख युरोपियन देशांना करून दिली. त्यांनी युरोपातील इंग्लंड, हॉलंड, पोर्तुगीज, फ्रान्स, ग्रीक, रोमन इत्यादी देशाशी व्यापार करून खूप नफा मिळविला. यासोबतच भारतात तयार होणारे सुती कापड, मसाले पदार्थ युरोपला पोहोचवले.

मसाल्याच्या पदार्थाची मागणी वाढल्यामुळे अरबी लोकांनी जास्त भावाने विक्रीस सुरूवात केली. मसाल्याच्या व्यापारावरील अरबी लोकांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी युरोपियनांनी अरबांशी चढाओढ केली. शेवटी युरोपियनांनी स्वतः भारताकडून मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्यास सुरुवात केली. या काळात रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टँटिनोपल इथून माल युरोपमध्ये जात होता. 1953 मध्ये हे शहर तुर्कांच्या ताब्यात गेल्यामुळे युरोपियनांना भारताशी व्यापारासाठी नवीन सागरी मार्ग शोधण्याची आवश्यकता भासली.

युरोपियनांनी भारताकडे जाणारा समुद्र मार्ग शोधण्यासाठी खलाशी पाठवण्यास सुरुवात केली. त्यापैकी एक पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा हा 1498 मध्ये केप ऑफ गुड होपला वळसा घालून लक्षद्वीप मार्गे कोची येथे पोहोचला. हा भारताला जोडणारा नवीन सागरी मार्ग इतर प्रवाशांना खुला झाल्यामुळे भूमार्गाने थांबलेला मसाल्यांचा व्यापार जलमार्गाने मोठ्या प्रमाणात सुरु झाला.



## अध्ययन पत्रक 17

**कृती 1:** वरील उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या

**1. अरेबियन जनजीवन कसे होते ?**

**2. अरेबियनांनी भारतातील कोणकोणत्या वस्तू युरोपला पाठवल्या ?**

**3. भारतातील कोणत्या वस्तूला युरोपमध्ये जास्त मागणी होती?**

**4. तुर्की लोक युरोपीयनावर रागवण्याचे कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?**

## अध्ययन पत्रक 18

**कृती 1:** खाली दिलेली स्थळे जगाच्या नकाशात ओळखा

लिस्बन, केप ऑफ गुड होप, मादागास्कर, मोझांबिक, लक्षद्वीप, गुजरात, कोचीन




**कृती 2:** दिलेल्या नकाशात वास्को-द-गामा भारतात आलेला जलमार्ग रेषेच्या सहाय्याने दाखवा.



**कृती 3:** खाली काही स्थळांना पूर्वीची नावे दिली आहेत. आता त्या स्थळांना आजची नावे शोधून देऊ शकाल का ?

| अ.न. | स्थळांची पूर्वीची नावे | स्थळांची आजची नावे |
|---|---|---|
| 1. | कॉन्स्टँटिनोपल | |
| 2. | सिलोन | |
| 3. | कलकत्ता | |
| 4. | बॉम्बे | |
| 5. | पर्शिया | |
| 6. | मेसापोटोमिया | |

**कृती 4:** रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1. प्राचीन काळातील युरोपचे प्रवेशद्वार असणारे शहर ________________.
2. भारतात आलेला युरोपियन खलाशी ________________.
3. भारताशी मसाल्यांचा व्यापार प्रथम ________________ यांनी सुरुवात केली.
4. कॉन्स्टॅन्टिनोपलवर ________________ यांनी ताबा मिळविला.
5. भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तू ________________.

**माझे अध्ययन कसे झाले ? (✓ करा.)**

| अध्ययन अंश | समजले होते | अर्थ समजावून घेतला आहे | समजावून घेतलेले अध्ययन अंश सहकाऱ्यांबरोबर चर्चा करतो | विषयाला संबंधित अंश स्वतः सांगतो |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**माझ्या अध्ययनाविषयी शिक्षकांचा अभिप्राय**

| |
|---|
| शिक्षक सही |

## अध्ययन अंश 10

# ईस्ट इंडिया कंपनीचा विस्तार

